जा.क्र.वि.शा./निवडणुक कक्ष/ 13461 /२०२४
पोलीस उप आयुक्त, वि.शा. कार्यालय,पुणे
दिनांक :- १८/११/२०२४

विषय :- भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (बी.एन.एस.एस) २०२३ चे कलम १६३ प्रमाणे आदेश.

आदेश

ज्याअर्थी, निवडणूक आयोग, भारत सरकार यांचे मुख्य निवडणुक अधिकारी, भारत सरकार यांचे प्रेसनोट क्र.ECI/PN/149/2024 DATE 15.10.2024 अन्वये महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूका घेण्याचा कार्यक्रम जाहीर केलेला आहे. आचारसंहीता दिनांक १५/१०/२०२४ रोजी पासून निवडणूकीचा निकाल जाहीर होईपर्यंत अस्तित्वात राहील. पुणे शहर पोलीस आयुक्तालय हद्दीमध्ये १९८ शिरुर, २०२ पुरंदर, २०३ भोर, २०८ वडगावशेरी, २०९ शिवाजीनगर, २१० कोथरुड, २११ खडकवासला, २१२ पर्वती, २१३ हडपसर, २१४ पुणे कॅन्टोंमेंन्ट व २१५ कसबा पेठ असे एकुण ११ विधानसभा मतदार संघात दिनांक २०/११/२०२४ रोजी मतदान होणार असून, मतमोजणी ही दिनांक २३/११/२०२४ रोजी होणार आहे.

त्याअर्थी, सदरच्या निवडणूका ह्या सुरळीतपणे व शांततेत पार पाडणे साठी पुणे पोलीस आयुक्तालयाचे हद्दीत कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू नये म्हणून राष्ट्रीय निवडणुक आयोग, भारत सरकार यांचे मतदान संबंधीत शेवटच्या ७२ तासाचे **S.O.P.** मधील मुद्दा क्र. ७.१ मधील तरतुदीला अनुसरुन, **मी रंजन कुमार शर्मा, पोलीस सह आयुक्त, पुणे शहर** मला भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (बी.एन.एस.एस) २०२३ चे कलम १६३ प्रमाणे प्राप्त झालेल्या अधिकारानुसार दिनांक १८/११/२०२४ रोजीचे १८.०० वा. पासुन ते दिनांक २०/११/२०२४ रोजी मतदान प्रक्रिया संपेपर्यंत पुणे शहर पोलीस आयुक्तालय हद्दीमध्ये कोणत्याही प्रकारे ध्वनीक्षेपकाचा वापर करण्यास मनाई असल्याबाबत आदेश देत आहे.

हा आदेश संपूर्ण पुणे पोलीस आयुक्तालयाचे हद्दीत दिनांक १८/११/२०२४ चे १८.०० वा. पासून ते दिनांक २०/११/२०२४ रोजी मतदान प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत लागू राहील. सदरचा आदेश भंग करणारी व्यक्ती भारतीय न्याय संहिता कलम २२३ नुसार शिक्षेस पात्र राहील.

सदरचा आदेश माझे सही शिक्क्यानिशी आज दिनांक १८/११/२०२४ रोजी दिला आहे.

ठिकाण :- पुणे शहर
दिनांक :- १८/११/२०२४

(रंजन कुमार शर्मा)
पोलीस सह आयुक्त,
पुणे शहर